दैनिक
# मराठवाडा पत्र
● छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर ●

शुक्रवार
७.२.२०२५
वर्षे : ४ अंक : ३०१
किंमत : ३ रू. पाने : ४

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 पान -१




# मला महिन्याला फक्त २ लाख रुपये नकोत

## कोर्टात जिंकल्यानंतर करुणा मुंडेंची धनंजय मुंडेकडे नवी मागणी

**मुंबई** । वृत्तसेवा

करुणा शर्मा यांनी धनंजय मुंडे यांच्याविरोधात सुरू असलेल्या कायदेशीर लढाईत मोठा विजय मिळवला आहे. कोर्टाने त्यांना धनंजय मुंडे यांची पहिली पत्नी म्हणून मान्यता दिली. निकालानंतर त्यांनी आपल्या भावना व्यक्त करत न्यायालय, न्यायाधीश आणि त्यांच्या वकिलांचे आभार मानले. यासोबतच त्यांनी स्वतःसाठी आणि मुलांसाठी मिळालेल्या पोटगीबाबत असमाधान व्यक्त केला. करुणा शर्मा यांनी न्यायालयाचा निर्णय स्वागतार्ह असल्याचे सांगितले. कोर्टाने मला पहिली पत्नी म्हणून मान्यता दिली आहे. त्यामुळे मला करुणा मुंडे म्हणूनच संबोधा. हा माझा हक्क आहे, जो मी मोठ्या संघर्षातून मिळवला आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. तीन वर्षांपासून सुरू असलेल्या लढाईचा त्यांनी उल्लेख करत, या प्रकरणात न्याय मिळण्यासाठी त्यांनी किती मोठी किंमत चुकवावी लागली, यावरही त्यांनी भाष्य केले. यावेळी त्यांनी आपल्या वकिलाचे विशेष कौतुक केले. गणेश कोल्हे (ऋपशीह घेश्रहश) यांनी एक रुपयाही न घेता माझा खटला लढला. बीडहून मुंबईपर्यंत वारंवार येऊन त्यांनी मला मदत केली. शेवटी आम्ही न्यायालयात विजय मिळवला, यासाठी मी सर्वांची आभारी आहे, असे करुणा शर्मा म्हणाल्या.



### पोटगीबाबत नाराजी आणि हायकोर्टात जाण्याचा निर्णय

करुणा शर्मा यांनी न्यायालयाने दिलेल्या २ लाख रुपये पोटगीवर समाधान नसल्याचे स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, माझा महिन्याचा खर्च १ लाख ७० हजार रुपये आहे, आणि फक्त ३० हजार रुपये मेन्टेन्ससाठी मिळत आहेत. एका नोकराच्या नावावर ४ हजार कोटी रुपयांची मालमत्ता असताना माझ्या आणि मुलांच्या नावावर काहीच नाही. माझा मुलगा बेरोजगार आहे, आणि आमच्या महिन्याच्या खर्चासाठी किमान १५ लाख रुपये आवश्यक आहेत. त्यांनी पुढे स्पष्ट केले की, कोर्टाच्या निर्णयावर त्या समाधानी नाहीत आणि हायकोर्टात दाद मागणार आहेत. त्यांच्या मते, न्यायालयाने दिलेली रक्कम अत्यंत अपुरी आहे, आणि याबाबत अधिक लढा देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

### नागरिकांच्या सुविधेसाठी

# बीड पोलीसांचा ‘प्रोजेक्ट संवाद’



## एसपी नवनीत कॉवत यांचा उपक्रम

**बीड** । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील नागरिकांसाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत (भा.पो.से.) यांच्या संकल्पनेतून ‘प्रोजेक्ट संवाद’ हा उपक्रम राबवला जात आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या नागरिकांना अनेकदा पोलीस ठाण्यात काम असल्यास मोठा प्रवास करावा लागतो. त्यासाठी वेळ आणि पैसा खर्च होतो, तरीही काही वेळा समाधानकारक सेवा मिळत नाही. यावर उपाय म्हणून हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. जर नागरिक पोलीस ठाण्याच्या सेवेस असमाधानी असतील, तर त्यांची समस्या पोलीस ▶▶पान २ वर

### क्यूआर कोडद्वारे सोपी तक्रार नोंदणी

या उपक्रमाअंतर्गत प्रत्येक पोलीस ठाण्यात आणि अधिकाऱ्यांच्या कक्षात क्यूआर कोड लावण्यात आला आहे. नागरिकांनी त्यांच्या मोबाईलद्वारे हा क्यूआर कोड स्कॅन केल्यास त्यांना एक फॉर्म मिळेल. या फॉर्ममध्ये खालील नाव, मोबाईल क्रमांक, संबंधित ▶▶पान २ वर

# नैसर्गिक आपत्तीमुळे बाधितांच्या बँक खात्यावर ५९२ कोटी ३४ लाख ९० हजाराची मदत डीबीटीद्वारे वर्ग

## बीड जिल्ह्यातील १ लाख १५ हजार ९१० लाभार्थींना १०६ कोटी १२ लाख ७७ हजार ४२२ रुपये मदत

**मुंबई** । प्रतिनिधी

अतिवृष्टी, पूर, अवेळी पाऊस, दुष्काळ, वादळी वारा व गारपीट या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकरी व अन्य घटकांना राज्य शासनाने वेळोवेळी शासन निकषानुसार मदत जाहीर केली होती. यातील ५ लाख ३९ हजार ६०५ लाभार्थ्यांना ५९२ कोटी ३४ लाख ९० हजार ५३० रुपयांची मदत संबंधित लाभार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत डीबीटीद्वारे वर्ग करण्यात आली आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली. आधारसंलग्न बँक खात्यावर डीबीटीद्वारे वर्ग करण्यात आलेल्या मदतीमध्ये अतिवृष्टी/पूर सन २०२२, सन २०२३, सन २०२४, अवेळी पाऊस २०२२-२०२३, व २०२३-२०२४, अवेळी पाऊस/अतिवृष्टी २०२३-२०२४, दुष्काळ २०२३ आणि जून २०१९ मध्ये वादळी वारा व गारपीट या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या लाभार्थींचा समावेश आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकरी व नागरिकांना शासनाकडून ही मदत त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर वर्ग झाल्यामुळे या घटकांना दिलासा मिळेल, असा विश्वासही मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी व्यक्त केला. मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले, या मदतीमध्ये अमरावती ▶▶पान २ वर

# मेंगडेवाडी गावात बिबट्याच्या हल्ल्यात वयोवृद्ध महिलेचा मृत्यू

**पाटोदा** । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील मेंगडेवाडी गावातील उखारा शिवारात आज दि.६ गुरूवार रोजी दुपारी बिबट्याच्या हल्ल्यात श्रीमती सोजरबाई धोंडीराम बोबडे वय ६५ वर्षे या वयोवृद्ध महिलेचा मृत्यू झाला असुन या परीसरात बिबट्याची दहशत पसरली आहे. वनविभाग आणि पोलिस प्रशासनाला याची फोनवरून भगवान शिंदे यांना कळविण्यात आले आहे. भगवान शिंदे यांच्या म्हणण्यानुसार श्रीमती सोजरबाई धोंडीराम बोबडे या दुपारी १२ वाजता शेतातील जनावराच्या (पान २ वर)



## तरूण गंभीर जखमी



दोन वर्षापुर्वी आष्टी, पाटोदा तालुक्याता एका नरभक्षक बिबट्याने धुमाकूळ घालुन अनेकावर हल्ला केला होता. वनविभागाने त्या बिबट्यास जेरबंद केले होते. आता पुन्हा एकदा एका बिबट्याने शेतात गेलेल्या तरूणावर हल्ला केला. धाडसी तरुणाने बिबट्याला प्रतिकार करत त्यालाही चावा घेतल्याने बिबट्या पळून गेला. बिबट्याच्या या (पान २ वर)

# तंगडे तोडू, जीवे मारू, ठोकून काढू



**बीड** । प्रतिनिधी

जिल्ह्यातील मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणानंतर येथील राजकीय व सामाजिक वातावरण तापलं असून मंत्री धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. सरपंच खून प्रकरणातील आरोपी, व खंडणी प्रकरणातील आरोपी हे मंत्री धनंजय मुंडेंचे निकटवर्तीय असल्याचा आरोप करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. विशेष म्हणजे राजीनाम्यासाठीचा वाढता दबाव पाहून धनंजय मुंडेंनी थेट भगवान गड गाठून महंत नामदेव शास्त्रींसोबत (छरावशे ीहरीीीळ) चर्चा केली. त्यानंतर, भगवाड गड भक्कमपणे धनंजय मुंडेंच्या पाठीशी असल्याचं नामदेव शास्त्रींनी म्हटलं होतं. तसेच, आरोपींच्या मानसिकतेवर महंतांनी केलेल्या वक्तव्यानंतर त्यांच्यावर टीकेची झोड उठली. आता, महंत नामदेव शास्त्रींच्या भूमिकेवर भाष्य करणाऱ्या बीडमधील भागचंद महाराज झांजे यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात येत आहेत. यासंदर्भात झांजे महाराजांनी बीड पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दिली आहे. माझ्या जीविताचं काही बरं वाईट झालं तर याला भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री महाराज आणि त्यांचे अनुयायी जबाबदार असतील, असे भागचंद महाराज झांजे यांनी पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या तक्रारीत म्हटलं आहे. महंत नामदेव शास्त्री महाराजांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींच्या मानसिकते संदर्भात ▶▶पान २ वर

## बीडमधील झांजे महाराजांना धमकि, एसपींकडे तक्रार

# बनावट पिस्टलसह फोटो केला व्हायरल

**बीड** । प्रतिनिधी

बनावट पिस्टल हातात धरून काढलेला फोटो सोशल मीडियावर व्हायरल करणाऱ्या फोटोग्राफर आणि संबंधित व्यक्तीवर पिंपळनेर पोलिसांनी कारवाई केली आहे. पोलीस स्टेशनला मिळालेल्या माहितीनुसार, सिध्दार्थ वक्ते (रा. नाथापूर, बीड) याने हातात पिस्टलसारखे दिसणारे शस्त्र घेऊन

## दोघांवर कारवाई

फोटो काढून सोशल मीडियावर व्हायरल केला. चौकशीत त्याने सांगितले की, हे पिस्टल फोटोग्राफर धनंजय हिंगे (रा. रानमळा, गेवराई) यांचे असून, ते केवळ फोटोशूटसाठी वापरण्यात आले होते. पोलिसांच्या तपासात ▶▶पान २ वर

# राहुल सोलापूरकरच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध



**लिंबागणेश** । प्रतिनिधी

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या आग्र-याहुन सुटकेच्या प्रसंगाबद्दल केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ आज दि.०६ गुरुवार रोजी लिंबागणेश येथील शिवतीर्थ याठिकाणी शिवप्रेमींनी राहुल सोलापूरकर यांच्या विरोधात घोषणाबाजी करत प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त केला. याचवेळी ईतिहासाची मोडतोड करून हेतुपुरस्सर शिवरायांचा अवमान करून शिवप्रेमींच्या भावना जाणिवपूर्वक दुखावणा-या राहुल सोलापूरकर यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी ▶▶पान २ वर

### सात गावातील विद्युत पुरवठा बारा दिवसांपासून बंद

# महावितरण विरोधात शेतकऱ्यांचा मोर्चा

**बीड** । प्रतिनिधी

खांडेपारगावसह सात गावातील विद्युत पुरवठा गेल्या दहा ते बारा दिवसांपासून बंद असल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊ लागले आहे. विद्युत पुरवठा सुरळीत करावा या मागणीसाठी आज गावकऱ्यांनी वीज वितरण कंपनीच्या कार्यालयावर मोर्चा काढला. या मोर्चामध्ये शेकडो शेतकऱ्यांचा सहभाग होता. हा मोर्चा राजेंद्र आमटे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आला होता. खांडेपारगाव, अंथरवणपिंप्री, नागापूर खुर्द, उमरी, उमरद खालसा, अंथरवणपिंप्री तांडा, नागापूर बु. येथील विद्युत पुरवठा गेल्या दहा ते बारा दिवसांपासून बंद आहे. लाईट नसल्याने शेतकऱ्यांचे पिके करपू लागले आहेत. तसेच दहावी आणि बारावीच्या परीक्षा येत्या काही दिवसांमध्ये होत आहे. लाईट नसल्याने विद्यार्थ्यांना अभ्यास करता येत नाही. वारंवार सांगूनही विज वितरण कंपनी विजपुरवठा सुरळीत करत नाही. सात गावांसाठी मंजूर असलेला ५ एमव्हीपी ट्रान्सफार्मर तात्काळ बसविऱ्यात यावा, जुन्या तारा बदलून नव्या तारा बसवण्यात यावे, इंजिनिअर भागानगरे यांची बदली करण्यात यावी, लाईनमन शेख यांची पुन्हा नियुक्ती करण्यात यावी, सात गावातील विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात यावा यासह इतर मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. हा मोर्चा राजेंद्र आमटे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आला होता. यावेळी शिवसंग्रामचे कार्यकर्ते, पदाधिकारीही उपस्थित होते.





# आहे बहुमत म्हणून..?



लोकशाहीत विरोधी पक्षाचे काम असते, सत्ताधाऱ्यांच्या उणिवा, धोरणातील त्रुटी संसदीय मर्यादांचे पालन करत मांडणे. हे वास्तव लक्षात घेतले तर सोमवारी संसदेत राहुल गांधी यांनी केलेले भाषण सर्व मर्यादांचे पालन करणारे आणि नियमाधीन होते. असे असताना त्यांचे भाषण संसदीय नोंदीतून काढून टाका, त्यांच्यावर हक्कभंग आणा, त्यांना ही शिक्षा करा, ती कारवाई करा अशा सत्ताधारी पक्षीयांच्या मागण्या त्यांच्या राजकीय, एकंदर बौद्धिक आणि सांसदीय समजाची कीव करावी अशा ठरतात. खरेतर सत्ताधारी पक्षाचे मोजके काही सोडले तर अन्यांची कुवत संसदेतील बाके बडवत 'मोदी मोदी' असा जयघोष करण्यापुरतीच आहे, हे काही आता लपून राहिलेले नाही. कारण आपले लांगूलचालन, लाळघोटेपणा, हुजरेगिरीची वृत्ती लपवावी असेही या सर्वांस आता वाटेनासे झाले आहे इतकी ही मंडळी सपक आणि पचपचीत आहेत. त्यांचे ठीक. कारण इतकी लाचारी दाखवता आली नाही तर हाती नारळ मिळेल हे ते जाणतात. पण म्हणून विरोधकांनीही बाके बडवत मोदी-घोष करावा अशी या सत्ताधाऱ्यांची इच्छा आहे की काय? जरा काही टीका झाली रे झाली की हे सर्व एकवटतात आणि टीका करणाऱ्याचे भाषण असंसदीय ठरवू पाहतात. राहुल गांधी यांच्या ताज्या भाषणाबाबत पुन्हा एकदा तसे झाले. इंग्रजीत 'क्राय बेबी' असा एक शब्दप्रयोग केला जातो. 'कायम किरकिरे बाळ' असे त्याचे मराठीकरण करता येईल. ही उपाधी खरे तर विरोधी पक्षीयांस देता यायला हवी. पण त्यांच्यापेक्षा जास्त किरकिरे सत्ताधारीच झालेले दिसतात. अशा वेळी राहुल गांधी नक्की बोलले तरी काय, हे पाहायला हवे. चीनची औद्योगिक प्रगती, कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील आघाडी, आपले प्रयोग, त्या क्षेत्रातील आव्हाने, वाढती बेरोजगारी, त्यात काँग्रेससह भाजपलाही अपयश येत असल्याची कबुली, अमेरिकेच्या अध्यक्षांचा शपथविधी, त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांस आमंत्रण न येणे इत्यादी मुद्दे त्यांच्या भाषणात होते आणि कोठेही अदानी-अंबानी यांचा उल्लेख नव्हता. पण सत्ताधारी रागावले ते ट्रम्प यांच्या शपथविधीस मोदी यांस आमंत्रण न दिले जाणे आणि ते दिले जावे यासाठी परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी वॉशिंग्टनमधे मुक्काम ठोकणे याचा राहुल गांधी यांनी केलेल्या उल्लेखांमुळे. त्यावर जयशंकर यांनी आपल्या राजापेक्षा राजनिष्ठतेच्या सवयीप्रमाणे खुलासा केला आणि राहुल गांधी यांच्या टीकेमुळे परदेशात भारतास मान खाली घालावी लागल्याचा दावा केला. यातील जयशंकर हे मोदी यांस निमंत्रण यावे यासाठी प्रयत्न करीत होते किंवा काय याबाबत दुमत असू शकते. पण निमंत्रण नव्हते ही बाब कशी नाकारणार? जयशंकर म्हणतात, मोदी अशा समारंभास जात नाहीत, तेव्हा निमंत्रण मिळवण्याचा प्रश्नच नव्हता. यातील मोदी जात नाहीत हे विधान खरे मानले तरीही भारतीय पंतप्रधानांस ट्रम्प यांनी स्वत:च्या शपथविधीस बोलावले नाही, हे सत्य कसे लपणार? चीनच्या जिनपिंग यांस जाहीर निमंत्रण दिले गेले आणि त्यांनी ते जाहीर नाकारले. आपणास जाहीर वा खासगी निमंत्रण दिले गेले नाही आणि तरीही ते आपण जाहीर नाकारणार हे कसे? तसे निमंत्रण दिले असते आणि मग मोदी गेले नसते तर या युक्तिवादास अर्थ होता. पण मुदलात ज्याला बोलावलेलेच नाही तो ''मला जायचेच नव्हते'' असे नंतर म्हणाल्यास त्याला किती महत्त्व द्यावे हे बालबुद्धीही जाणतात. तेव्हा ''मी मोदींच्या निमंत्रणासाठी प्रयत्न केले नाहीत'' इतकेच बोलून जयशंकर गप्प बसले असते तर त्यात निदान शहाणपणा तरी दिसला असता. पण नाही. तितकेच केले असते तर राजनिष्ठा कशी दिसली असती? वास्तविक अमेरिकेत जाऊन ''अगली बार ट्रम्प सरकार'' अशी हाळी कोणी दिली, अहमदाबादला कोणी कोणास गळामिठी दिली वगैरे हे सर्व जाणतात. आणि इतके करूनही शपथविधीचे निमंत्रण आले नसेल तर होणाऱ्या वेदना समजून घेता येणे अवघड नाही. पण सत्ताधाऱ्यांची इतकी अरेरावी असेल तर विरोधकांनी ही सहानुभूती का दाखवावी? तेव्हा या भाषणावर कारवाई करावी अशी मागणी करण्यासारखे त्यात काय आहे? तीच बाब सोनिया गांधी यांच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या भाषणावरील प्रतिक्रियेविषयी. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाचे कौतुकच करायला हवे असा काही नियम आहे काय? असेल तर तो कधी अस्तित्वात आला? मग काँग्रेसकालीन राष्ट्रपतींवर भाजप नेते इतकी वर्षे टीका करत आले आहेत त्याचे काय? आणि मुख्य म्हणजे भाजपच्या होयबांचा संताप व्हावा असे सोनिया गांधी म्हणाल्या तरी काय? द्रौपदीबाईंचे भाषण नुसते कंटाळवाणे नव्हते, तर ते कमालीचे कंटाळवाणे होते. ते तसेच असणे अपेक्षित होते. मुळात राष्ट्रपतींचे भाषण हे राष्ट्रपतींचे नसते. ते मंत्रिमंडळाने मंजूर केलेले असते. राष्ट्रपती फक्त त्याचे वाचन करतात. हे भाषण म्हणजे सरकारी योजनांची जंत्री होती. यातही काही नवीन नाही. त्यात द्रौपदीबाई फर्ड्या वक्त्या नाहीत. अर्थात त्या जरा जरी तशा असत्या तर या पदावर विराजमान होत्या ना. व्यक्ती जितकी सपाट आणि सुमार; तितकी तिच्या उच्चपदी नियुक्तीची शक्यता अधिक हे सद्यकालीन सत्य. पण सोनिया गांधी यातील काहीही म्हणाल्या नाहीत. ''बिच्चाऱ्या'' (पुअर थिंग) हे सोनिया गांधी यांनी या भाषणाविषयी वापरलेले विश्लेषण. ''बोलून बोलून दमल्या'' (गॉट टायर्ड ऑफ स्पीकिंग) हे त्यांनी केलेले भाषणाचे वर्णन. यात ''आदिवासी महिलेचा अपमान'' वगैरे कसा काय होतो? स्त्रीदाक्षिण्य, सभ्यता यांचा येथे आदर होतो असे म्हणावे तर ''जर्सी गाय'' वगैरे उल्लेखांचे काय? आता या भाषणाविषयी सोनिया गांधी यांच्यावरही कारवाईची मागणी केली जात आहे. एकंदर परिस्थिती लक्षात घेता अध्यासनांकडून ती पूर्ण होईलही. पण राष्ट्रपतींवर टीका करण्यास मनाई आहे काय, हा प्रश्न तसाच राहील. सद्य:स्थितीत परीक्षेस जाणाऱ्या नातवंडाच्या हाती दही-साखर ठेवण्याची 'जबाबदारी' असलेल्या घरगुती आजीशी राष्ट्रपतींची तुलना होऊ शकेल. तथापि घरची आजी दही-साखर हाती फक्त ठेवते. राष्ट्रपती महोदयांवर ते भरवण्याची वेळ येते. एरवी राष्ट्रपतीपदाची 'गरिमा' वगैरेविषयी कंठरवात वचावचा करणाऱ्यांस मंत्र्यासंत्र्यांस दही-साखर भरवणे हे राष्ट्रपतींचे काम आहे काय, हा प्रश्न पडू नये? तेव्हा यातही सोनिया गांधी यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी करण्यासारखे काही नाही. उलट अशी मागणी करणे, राहुल-सोनिया यांच्याविरोधात देशभरात खटले दाखल होतील हे पाहणे वगैरे हास्यास्पद कृत्यांमुळे सत्ताधाऱ्यांस या मायलेकांची भीती वाटते की काय, असा प्रश्न पडतो. अमेरिकी अध्यक्षांच्या पदग्रहण सोहळ्याचे निमंत्रण आले नसले तरी विश्वभरात आदरणीय नेतृत्व, जगातील सगळ्यात मोठा पक्ष असूनही त्या पक्षाने एका य:किश्चित पक्षाच्या तितक्याच य:कश्चित मायलेकांस घाबरताना दिसणे योग्य नाही. ते तसे नसेल तर-आणि ते तसे नसेलच-या ऊठसूट कारवाईच्या मागण्या करणे त्यांस शोभत नाही. आहे बहुमत म्हणून आणि ते गोड मानून घेणारे तालिकाप्रमुख म्हणून असे करणे लोकशाहीच्या जननीच्या प्रतिष्ठेस बाधा आणते.

# बीडच्या मॉडेल इंग्लिश हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची स्नेहसंमेलनात चमकदार कामगिरी

## आ.पंडित,माजी आ. सय्यद सलीम,माजी आ.देशमुख यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

बीड, (प्रतिनिधी ) - बीड शहरातील जिजामाता चौक मसरत नगर येथील मॉडेल इंग्लिश हायस्कूलच्या वतीने घेण्यात येणारा स्नेहसंमेलनाचे उद्घाटन आ. विजयसिंह पंडित यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली. बीड येथील सफदर अली देशमुख वेल्फेअर ट्रस्ट संचलित मॉडेल इंग्लिश हायस्कूलचे वार्षिक स्नेह संमेलन २०२५ मोठ्या उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते झाले, अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार ड. सिराजोद्दीन देशमुख यांची तर प्रमुख अतिथी म्हणून माजी आ. सय्यद सलीम, भाजपचे जिल्हा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, नगरसेवक जगदीश गुरखुदे, संपादक शेख मुजीब, माजी सभापती खुर्शीद आलम, संस्थेचे सचिव सुजात देशमुख, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव फरीद देशमुख, ज्येष्ठ



पत्रकार सी. आर. पटेल, प्रा. परवेज युसूफ जई, प्रा. गोपाल धांडे, परवेज देशमुख, नासेर पठाण, जलील अन्सारी, मोहंमद खमर , नॅशनल उर्दू शाळेचे मुख्याध्यापक रजियोद्दीन इनामदार, न्यू उर्दू शाळेचे मुख्याध्यापक सय्यद नासेर अली, मुजीबूर रहेमान , बरकत पठाण, अजीम पठाण, राजकुमार जैन, उप प्राचार्य चंद्रकांत देशमुख, मुख्याध्यापक फरीदा बेगम, नईम देशमुख, मेराज देशमुख, सफदर देशमुख, अमानत अली देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्याने आलेल्या पाहुण्यांच्या स्वागत केले. यावेळी आमदार विजयसिंह पंडित यांचा सत्कार सफदर देशमुख यांनी तर माजी आमदार सलीम सय्यद यांचा सत्कार अमानत अली देशमुख यांनी केला. शाळेच्या प्राचार्या प्रिया सुकूमारण यांनी प्रास्ताविक भाषणात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या या स्नेहसंमेलनाचे महत्त्व सांगितले. आपल्या पाल्याला मोबाईलपासुन उद्भवणारे आजार अन् त्याच्या कारणांवर इयत्ता ३ री व ४ थी च्या विद्यार्थ्यांनी सुंदर असे नाटक सादर केले. या नाटकाची कोरिओग्राफी शाहीन टीचर यांनी केली.ङ्गसोबतच सफदर अली देशमुख वेल्फेअर ट्रस्टच्या डॉ. झाकिर हुसेन स्कूलच्या विद्यार्थ्यांनी शिक्षण अन् देशभक्तीवर सुंदर असे नृत्य सादर केले. शेवटी कार्यक्रमाचं वैशिष्ट असणाऱ्या मल्हारी या गाण्याने शेकडोंच्या गर्दीत जमलेल्या प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. यासाठी मॉडेल स्कूलच्या प्रियंका टीचर यांनी अथक परिश्रम घेतले. सोबतच विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य, गायन, वेशभूषा स्पर्धा, तसेच हास्यस्पर्धा सादर केल्या. प्रेक्षकांनी विद्यार्थ्यांच्या प्रस्तुतींना जोरदार प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या शेवटी आलेल्या पाहुण्यांच व पालकांचं मदीहा टीचर यांनी आभार मानले. सुत्रसंचलन नदीम सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मॉडेल इंग्लिश हायस्कूलचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# कोण रुपाली चाकणकर?

## कोर्टाने धनंजय मुंडेंना दोषी ठरवताच, करुणा शर्मांचा हल्लाबोल



मुंबई, (वृत्तसेवा):- राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते धनंजय मुंडे सध्या विविध कारणांमुळे चांगलेच अडचणीत आले आहेत. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात त्यांच्यावर राजीनामा देण्याची वेळ येण्याची शक्यता आहे. याचदरम्याम आता कौटुंबिक प्रकरणांत मुंडे दोषी ठरले आहेत. वांद्रे कौटुंबिक न्यायालयाने मुंडे यांना झटका देताना त्यांना कौटुंबिक हिंसा प्रकरणात दोषी ठरवले आहे. करूणा मुंडेंना दरमहा २ लाखांची पोटगी देण्याचे आदेशही कौटुंबिक न्यायालयाने दिले आहेत. यानंतर करुणा मुंडे यांनी माध्यमांसमोर धनंजय मुंडे (उ्हरपरपक्षरू चींपवश) यांच्याविरोधात अनेक आरोप केले आहेत. सध्या यामुळे राज्यात जोरदार चर्चा सुरू झाली असतानाच करुणा शर्मा यांनी थेट महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावर जोरदार टीका करताना, कोण चाकणकर असा हल्लाबोल केला आहे. करुणा शर्मा यांना, न्याय मागण्यासाठी महिला आयोगात गेला होतात का? असा सवाल विचारण्यात आला होता. या प्रश्नाचं उत्तर देताना करुणा शर्मा भडकल्या. त्यांनी, कोण महिला आयोग? रुपाली चाकणकर? काय म्हणायचं आहे तुम्हाला? महिला आयोगात केवळ नेते लोकांना पाठिशी घालण्यासाठी आहे. रुपाली चाकणकर यासाठीच तिथे बसल्यात, असा घणाघात केला आहे. रुपाली चाकणकर यांना महिला आयोगाचे अध्यक्ष बनवलय अवघड आहे. मी राष्ट्रीय महिला आयोगात गेले आहे. मी दिल्लीत जाऊन पैसे खर्च करत त्यांना निवेदन दिलेली आहेत. रुपाली चाकणकरांना महिला आयोगातून हटवा, अशी मागणी देखील राष्ट्रीय महिला आयोगाला केल्याचं करुणा शर्मा म्हणाल्या. यावेळी करूणा शर्मा यांनी, आयोगाकडे खूप काही तक्रारी असतात. पण आजपर्यंत चाकणकर यांनी काय केलं? काहीही नाही. मात्र आता न्यायालयात लढून लढून मला लॉ काय आहे? हे समजायला लागलं आहे. जो आरोपी आहे, ज्याच्या विरोधात तुमच्याकडे तक्रारी आल्या आहेत. त्याच्यासोबत तुम्ही फोटोत एकत्रित येऊ नये, असा लॉ आहे. पण रुपालीताईंनी धनंजय मुंडेंची बाजू मांडलीये. ते आरोपी आहेत ना? माझी मुंडेंच्याबाबत तक्रार आहे रुपालीताईंकडे. खूप तक्रारी आहेत, पण आजपर्यंत चाकणकर यांनी काहीही केलेलं नसल्याचा दावा देखील करुणा शर्मा यांनी केलाय.

## पान १ वरून

### नागरीकांच्या सुविधेसाठी...

अधीक्षक कार्यालयाकडून २४ तासांच्या आत सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच, कोणालाही अवैध धंद्यांविषयी किंवा इतर गोपनीय माहिती द्यायची असल्यास, क्यूआर कोडद्वारे ती माहिती दिली जाऊ शकते. अशा तक्रारदारांची नावे गोपनीय ठेवली जातील.'प्रोजेक्ट संवाद' उपक्रमामुळे नागरिक आणि पोलिसांमधील समन्वय वाढणार असून, तक्रारींसाठी पोलीस ठाणे, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय किंवा पोलीस अधीक्षक कार्यालयात चकरा मारण्याची गरज भासणार नाही. त्यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैशांची बचत होईल. हा उपक्रम आजपासून (६ फेब्रुवारी २०२५) बीड जिल्ह्यात सुरू होत आहे. नागरिकांनी याचा सकारात्मक उपयोग करून पोलिसांसोबत अधिक सुसंवाद साधावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी केले आहे.

### क्यूआर कोडव्दारे...

पोलीस ठाण्याचे नाव, भेट देण्याचे कारण, सेवा समाधानकारक होती का? असमाधान असल्यास कारण काय, पोलीस ठाण्याला गुणांकन (१ ते ५), सुधारणा सुचना आदी माहिती भरता येईल.

### नैसर्गिक आपत्तीमुळे...

विभागामध्ये ४ हजार ६७१ लाभार्थ्यांना ७ कोटी ४० लाख २९ हजार ८२० रुपयांची मदत आधारसंलग्न बँक खात्यावर वर्ग केली आहे. यात अकोला जिल्ह्यातील ३६३ लाभार्थ्यांना ५१ लाख ९६ हजार ९४२ रुपये, अमरावती जिल्ह्यातील १ हजार ६३० लाभार्थ्यांना ३ कोटी ६१ लाख ८१ हजार ८८६ रुपये, बुलढाणा जिल्ह्यातील ६७४ लाभार्थींना १ कोटी २ लाख ५४ हजार ३८७ रुपये, वाशिम जिल्ह्यातील ४०१ लाभार्थींना ४९ लाख १९ हजार ४८८ रुपये तर यवतमाळ जिल्ह्यातील १ हजार ६०३ लाभार्थींना १ कोटी ७४ लाख ७७ हजार ११८ रुपयांची मदत वर्ग केली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागामध्ये ४ लाख ८३ हजार ८८३ लाभार्थींना ५१४ कोटी ८५ लाख २३ हजार २६० रुपयांची मदत आधारसंलग्न बँक खात्यावर वर्ग केली आहे. यात बीड जिल्ह्यातील १ लाख १५ हजार ९१० लाभार्थींना १०६ कोटी १२ लाख ७७ हजार ४२२ रुपये, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ३ हजार ४६३ लाभार्थींना २ कोटी ४२ लाख ७३ हजार ४७१ रुपये, धाराशिव जिल्ह्यातील २७ हजार ३०७ लाभर्थ्यांना ३६ कोटी २४ लाख ७ हजार ७४८ रुपये, हिंगोली जिल्ह्यातील ५६ हजार ८१ लाभार्थींना ६९ कोटी ७१ लाख ९७९ रुपये, जालना जिल्ह्यातील ८ हजार २४५लाभार्थींना १० कोटी ७४ लाख ७६ हजार ३९७ रुपये, लातूर जिल्ह्यातील २३ हजार ८४१ लाभार्थींना २१ कोटी ३४ लाख ४३ हजार ७५ रुपये, नांदेड जिल्ह्यातील २ लाख ३३ हजार २४२ लाभार्थींना २५० कोटी २८ लाख १ हजार ९५२ रुपये आणि परभणी जिल्ह्यातील १५ हजार ७९४ लाभार्थींना १७ कोटी ९७ लाख ४२ हजार २१७ रुपये बॅक खात्यावर डीबीटीद्वारे वर्ग करण्यात आले आहेत. कोकण विभागामध्ये ८६५ लाभार्थ्यांना २१ लाख ८१ हजार ७८१ रुपयांची मदत आधारसंलग्न बँक खात्यावर वर्ग केली आहे. यामध्ये रायगड जिल्ह्यातील १६ लाभार्थ्यांना १ लाख १० हजार ४८७ रुपये, रत्नागिरी जिल्ह्यातील ३ लाभार्थ्यांना ८ हजार ६०० रुपये, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ७०३ लाभार्थ्यांना १२ लाख ८८ हजार ६३४ रुपये, ठाणे जिल्ह्यातील एका लाभार्थीस ९ हजार रुपये, पालघर जिल्ह्यातील १४२ लाभार्थींना ७ लाख ६५ हजार ६० रुपये बॅक खात्यावर डीबीटीद्वारे वर्ग करण्यात आले आहेत. नागपूर विभागात २० हजार ८९८ लाभार्थींना २६ कोटी ४३ लाख १० हजार ८६४ रुपये बॅक खात्यावर डीबीटीद्वारे वर्ग करण्यात आले आहेत. यामध्ये भंडारा जिल्ह्यातील १७६ लाभार्थींना २२ लाख ५६ हजार २१० रुपये, चंद्रपूर जिल्ह्यातील ५ हजार २८८ लाभार्थींना ४ कोटी ८६ लाख ७४ हजार ७५३ रुपये, गडचिरोली जिल्ह्यातील ६ हजार ७५२ लाभार्थ्यांना ८ कोटी ११ लाख ९४ हजार २१३ रुपये, गोंदिया जिल्ह्यातील ३ हजार १४६ लाभार्थींना ४ कोटी १२ लाख ४७ हजार २२३ रुपये, नागपूर जिल्ह्यातील ३ हजार ८७४ लाभार्थींना ७ कोटी ४० लाख ३० हजार ६७६ रुपये तर वर्धा जिल्ह्यातील १ हजार ६६२ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर १ कोटी ६९ लाख ७ हजार ७९० रुपये डीबीटीद्वारे वर्ग करण्यात आले आहेत. नाशिक विभागात १ हजार ९०९ लाभार्थ्यांना २ कोटी ७१ लाख ९१ हजार ७९१ रुपयांची मदत आधारसंलग्न बँक खात्यावर वर्ग करण्यात आली आहे. यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यात २२८ लाभार्थींना २९ लाख ६६ हजार ५४६ रुपये, धुळे जिल्ह्यातील ११५ लाभार्थींना १३ लाख ६१ हजार ४३७ रुपये, जळगाव जिल्ह्यातील १ हजार २६ लाभार्थींना १ कोटी ८७ लाख २९ हजार ७९५ रुपये, नंदूरबार जिल्ह्यातील ८ लाभार्थींना १ लाख २२ हजार ३१५ रुपये तर नाशिक जिल्ह्यातील ५३२ लाभार्थींना ४० लाख ११ हजार ६९९ रुपयांची मदत डीबीटीद्वारे वर्ग करण्यात अली आहे. पुणे विभागात २७ हजार ३७९ लाभार्थींच्या बँक खात्यावर ४० कोटी ७२ लाख ५३ हजार १३ रुपयांची मदत डीबीटीद्वारे वर्ग करण्यात आली आहे. यात कोल्हापूर जिल्ह्यातील १ हजार ६४ लाभार्थ्यांना ९९ लाख ६२ हजार ३७ रुपये, पुणे जिल्ह्यातील ३ हजार ३८३ लाभार्थ्यांना २ कोटी ३२ लाख ४५ हजार ९५२ रुपये, सांगली जिल्ह्यातील १ हजार ७८७ लाभार्थ्यांना १ कोटी ७७ लाख ४४ हजार २७९ रुपये आणि सोलापूर जिल्ह्यातील २१ हजार १४५ लाभर्थ्यांना ३५ कोटी ६३ लाख ७४५ रुपये रुपयांची मदत डीबीटीद्वारे आधारसंलग्न बँक खात्यावर वर्ग करण्यात आली.

### मेंगडीवाडी गावात...

गोठ्यात नेहमीप्रमाणे जात असतात. आज दुपारी ३ वाजता बिभिषण दासु शिंदे यांनी शेतातील जनावरे आणण्यासाठी जात असताना सोजरबाई यांचे प्रेत पाहीले.त्यांच्या अंगावरील जखमावरून बिबट्याने नरडीचा घोट घेतल्याचे दिसून आले.त्यांनी सोजरबाई यांच्या नातु जगन्नाथ बबन बोबडे यांना फोनवरून कल्पना दिली.त्यानंतर घटनास्थळी ग्रामस्थांनी धाव घेतली. भगवान शिंदे यांनी पाटोदा वनविभागाचे अधिकारी काळे ( मो.नं.९०७५४९५७६१ ) व पोलीस प्रशासन पोलिस निरीक्षक जाधव ( मो.नं. ७७२२०३५२०९) यांना फोन वरून कल्पना दिली. वनविभाग व पोलीस प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी पोहचणार आहेत.

### तरूण गंभीर जखमी...

हल्ल्यात रूण जखमी झाल्याने त्यांला उपचारार्थ जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही घटना आज सकाळी आष्टी तालुक्यातील कारेगाव येथे घडली. घटनेची माहिती जयदत्त धस यांना झाल्यानंतर त्यांनी याबाबत वन विभागाला सूचना देत बिबट्याचा शोध घेण्याची मागणी केली. दोन वर्षापुर्वी आष्टी पाटोदा तालुक्यामध्ये बिबट्याने धुमाकूळ घातला होता. काही नागरीकावर बिबट्याने हल्ला देखिल केला होता. वनविभागाने बिबट्याला जेरबंद केले होते. पुन्हा एकदा आता आष्टी तालुक्यात बिबट्या आला आहे. आज सकाळी गोवर्धन सिताराम येवले (वय २७) हा शेतामध्ये म्हशीला चारा टाकण्यासाठी गेला होता. यावेळी तारेच्या कुंपनवरून उडी मारून बिबट्याने गोवर्धनयेवले याच्यावर हल्ला चढवला त्याच्या हाताला, मानेला चावा घेतला. गोवर्धन हा भयभीत न होता बिबट्याला प्रतिकार करत बिबट्याच्या मानेला चावा घेतल्यानंतर बिबट्या त्या ठिकाणावरून पळून गेला. बिबट्याच्या हल्लयात तरुण जखमी झाल्याने त्याला बीडच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. बिबट्यामुळे कारेगाव परिसरामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### तंगडे तोडू, जीवे मारू...

केलेल्या वक्तव्यानंतर राज्यभरातून त्यांच्यावर प्रखर शब्दात प्रतिक्रिया उमटल्या. तर, सोशल मीडियातूनही महंतांना ट्रोल करण्यात आलं. दरम्यान, त्यावर भागचंद महाराज यांनी देखील माध्यमांना प्रतिक्रिया दिली होती. त्यामुळे, नामदेव शास्त्री महाराज यांच्या अनुयायांनी गेल्या पाच दिवसापासून फोनवरुन झांजे महाराजांना धमक्या देण्यास सुरू केलं आहे. महाराष्ट्रात फिरू देणार नाही, तंगडे तोडू जीवे मारू, ठोकून काढू, असे फोन कॉल झांजे यांना सुरू झाले आहेत. त्यामुळे, माझ्या जीवाचे काही बरे वाईट झाले तर याला महंत नामदेव शास्त्री महाराज आणि त्यांचे अनुयायीच जबाबदार असतील, अशा आशयाची लेखी तक्रार भागचंद महाराजांनी बीड पोलीस अधीक्षक कार्यालयात दिली आहे. महंत यांच्या वक्तव्यावर मी संवैधानिक मार्गाने प्रतिक्रिया दिली. चूक झाली असेल तर गुन्हा दाखल करा, मात्र मला जीवे मारण्याची धमकी का देता? असा सवाल हभप भागचंद महाराज झांजे यांनी उपस्थित केला आहे. तसेच, शास्त्री महाराजांनी माझ्यावर वार करण्याची धमकी देणाऱ्या अनुयायांना आवरावे, असे आवाहनही भागचंद महाराजांनी केलं आहे.

### बनावट पिस्टलसह...

ते शस्त्र प्रत्यक्षात एक खेळणी लायटर असल्याचे स्पष्ट झाले. मात्र, अशा प्रकारे फोटो व्हायरल केल्याने जनतेत भीतीचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता असल्याने पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड येथे दोघांविरोधात प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वांबर गोल्डे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपळनेर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि मधुसूदन घुगे व त्यांच्या टीमने केली. ✻ पोलिसांचे आवाहन : कोणीही हातात शस्त्र घेऊन मिरवताना किंवा अशा प्रकारचे फोटो व्हायरल करताना आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असे सपोनि मधुसूदन घुगे यांनी स्पष्ट केले आहे.

# ...म्हणून छगन भुजबळ भाजपमध्ये जाणार नाहीत

## नरहरी झिरवळांचा मोठा दावा

मुंबई (वृत्तसेवा):- नाराज असलेले माजी मंत्री छगन भुजबळ हे लवकरच राष्टवादी काँग्रेस सोडून भाजपमध्ये जाणार अशा चर्चा गेल्या अनेक दिवसापासून रंगल्या आहेत. नाराज असल्याने त्यांची भाजपशी जवळीकत वाढत असल्याची चर्चा असतानाच आता याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व अन्न औषध व प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी मोठे विधान केले. नाराज असलेले छगन भुजबळ हे खूप मोठ्या मनाचे नेते आहेत. त्यामुळे ते कदापि राष्ट्रवादी सोडून येत्या काळात भाजपसोबत जाणार नाहीत, असे सांगत य सुरु असलेल्या चर्चेला त्यांनी पूर्णविराम दिला. मंत्री नरहरी झिरवळ यांनी साम वृत्तवाहिनीच्या 'ब्लॅक अँड व्हाइट' कार्यक्रमप्रसंगी बोलताना हे मोठे विधान केले. यावेळी त्यांनी विविध प्रश्नांना दिलखुलासपणे उत्तरे दिली. नुकत्याच शिर्डी येथे पार पडलेल्या पक्षाच्या बैठकीला छगन भुजबळ (उहहरसरप इर्हीक्षलरश्र) काही वेळ उपस्थित हते. शिर्डीत ते काही वेळ थांबून निघून गेले होते.

## पान १ वरून

### राहुल सोलापूरकरच्या...

बालाघाटावरील शिवप्रेमींनी लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, अजितदादा पवार यांना केली आहे.यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील,विक्रांत वाणी , अँड.गणेश वाणी, दामोदर थोरात, अक्षय वाणी,अशोक वाणी,आरूण निर्मळ, जितु निर्मळ,राजेभाऊ मंडलिक, चिंतामण ढास, पांडुरंग वाणी , विवेक बागल, रेवण येडे,रवी वायभट, महावीर वाणी,विशाल येडे , नवनाथ बोराडे,सोनाजी शिंदे, रतन शिंदे,अक्षय येडे आदी सहभागी होते. अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी एका पॉडकास्ट मध्ये बोलताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या बद्दल आक्षेपार्ह विधान केले होते.शिवाजी महाराज हे चक्क लाच देऊन आग्र-याहुन सुटुन महाराष्ट्रात आले होते.ते मिठाईच्या पेटा-यातुन सुटले ही दंतकथा असल्याचे त्यांनी म्हटले होते.एवढेच नाही तर त्यावेळी पेटारे वगैरे काही नव्हते असं देखील राहुल सोलापूरकर म्हणाले. यामुळे एकंदरीतच राहुल सोलापूरकर यांच्या मनात बहुजन राजांबद्दल द्वेष असल्याचे त्यांच्या वक्तव्यातुन जाणवते. त्यांची मानसिकता ईतिहासाची मोडतोड करून शिवरायांच्या पराक्रमाबद्दल त्यांच्या बुद्धीचातुर्याबद्दल शंका उपस्थित करून महात्म्य कमी करण्याचे षडयंत्र दिसून येत आहे. यामुळे शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या असुन राहुल सोलापूरकर यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारुन निषेध व्यक्त करत त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात

### लिंबागणेशमधील रंधवेवस्तीवर दोन दिवस रेणुका देवी तांदळा प्रतिष्ठापणा सोहळा



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश जवळील रंधवे वस्तीवर देवीच्या छोट्याशा मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले असुन येत्या रविवार ९ **फेब्रुवारी** ते सोमवार १० फेब्रुवारी २०२५ रोजी दोन दिवस बारवातील रेणुका देवीच्या तांदळ्याचा प्राण प्रतिष्ठा सोहळा आयोजीत करण्यात आलेला आहे. बीड तालुक्यातील लिंबागणेश जवळील आहिल्यानगर - अहमदपूर महामार्गावरील रंधवेवस्तीवर बारवातील रेणुका देवीचे उपपीठ आहे. या ठिकाणी छोटेसे मंदिर उभारण्यात आले आहे. बृह्मवृंदाच्या उपस्थीतीत येत्या रविवार ९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९ ते २ वाजेपर्यंत गणेश पुजन, पुण्याहन वाचन, दशविधी स्नान , शय्या निवास, महाआरती कार्यक्रम होणार आहे. दुसऱ्या दिवशी सोमवार १० फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ८ ते १२ वाजेपर्यंत प्रात:देवता पुजन, अग्नीमंथन, अग्नीस्थापणा, देवतास्थापण, होमहवन होणार असुन दुपारी १२.०६ ते २.०७ वाजता , पुर्णाहुती, महाआरती होणार असुन तत्पूर्वी दुपारी ठिक १ वाजता स्थिर मुहूर्तावर रेणुका देवीच्या तांदळ्याची प्रतिष्ठापणा होणार आहे.

### आदर्श विद्यार्थी प्रेमी समाजसेविका या पुरस्काराने सीमा ओस्तवाल सन्मानित



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील ज्येष्ठ समाजसेविका सीमा मनोज ओस्तवाल यांच्या गुरु आनंद महिला सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षापासून बीड शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले जात आहे. याच कामाचं कौतुक करत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उर्दू गांधीनगर या शाळेच्या मुख्याध्यापिका सय्यद शबाना परवीन यांनी एका विशेष कार्यक्रमात त्यांच्या कामाचं कौतुक करत सीमा ओस्तवाल यांना विद्यार्थी प्रेमी समाजसेविका म्हणून सन्मानित करण्यातआले. बीड शहरातील ज्येष्ठ समाजसेविका म्हणून सीमा ओस्तवाल यांची ओळख आहे गुरु आनंद महिला सामाजिक प्रतिष्ठांच्या माध्यमातून जून -जुलै महिन्यात जिल्हा परिषद च्या शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप दरवर्षी केले जाते. त्याजवळ दिवाळीत गरजू, गरीब कुटुंबातील होतकरू, विधवा व परितक्त्या महिलांना दिवाळीमध्ये किराणा किट देऊन त्यांची दिवाळी गोड केली जाते. याच सामाजिक कार्याच केलेल्या कामाचं कौतुक म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उर्दू गांधीनगर या शाळेच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेल व बक्षीस वितरण सोहळात शाळेच्या मुख्याध्यापिका सय्यद शबाना प्रवीण यांनी समाज सेविका सीमा ओस्तवाल यांचा आदर्श विद्यार्थी प्रेमी समाजसेविका म्हणून गौरव करण्यात आला.

### खो-खो विश्वचषक विजेती कर्णधार प्रियंका इंगळेचा जनविकास महाविद्यालयात भव्य सहकुटुंब सत्कार

**केज । प्रतिनिधी**



तालुक्यातील बनसारोळा येथील जनविकास महाविद्यालयात भारताची पहिली महिला खो-खो विश्वचषक विजेती कर्णधार प्रियंका हनुमंत इंगळे हिच्या दैदीप्यमान यशाबद्दल जनविकास महाविद्यालयात सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे, सत्कारमूर्ती प्रियंका इंगळे तसेच प्रियंकाच्या मातोश्री सौ. सविता इंगळे, वडील श्री. हनुमंत इंगळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रियंका इंगळे हिचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे यांच्या हस्ते बुके, शॉल,स्मृतीचिन्ह व रोख ११०००/- रुपये देऊन सहकुटुंब सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देत असताना प्रियंका इंगळे हिने खो-खो खेळाविषयीचे स्वअनुभव सांगून विद्यार्थ्यांनी जे कोणते क्षेत्र निवडले आहे त्या क्षेत्रात स्वतःला झोकून देऊन परिश्रम केले पाहिजेत असे मत व्यक्त केले.

# रेल्वे पुलांचा विषय आ.संदीप क्षीरसागरांनी रेल्वे सुरक्षा आयुक्तांसमोर मांडला

## बीड मतदारसंघात ब्रीज नसलेल्या ठिकाणी वाहतुकीस अडचण

**बीड । प्रतिनिधी**



बीड मतदारसंघातील काही ठिकाणी रेल्वे ब्रीज नसल्यामुळे वाहतुकीस अडचण होत आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागरांचा गेल्या अनेक दिवसांपासून पाठपुरावा सुरू आहे. दरम्यान बुधवारी (दि.५) रोजी बीड रेल्वेची हाय स्पीड टेस्ट करण्यासाठी रेल्वेचे सुरक्षा आयुक्त मनोज अरेरा आले असता त्यांच्यासमोर आ.संदीप क्षीरसागर यांनी हा विषय मांडला. बीड मतदारसंघातील क्षेत्रांतर्गत शिरूर कासार तालुक्यातील हिवरसिंगा, बरगवाडी, जवळागिरी तसेच बीड तालुक्यातील चर्हाटा येथे जाण्यासाठी रेल्वे पूल करण्यात आला नाही. त्यामुळे या गावांमध्ये वाहतुकीस मोठी अडचण होत आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागरांचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. शासन आणि प्रशासनाकडे याविषयी आ.क्षीरसागर यांनी अनेकवेळा पत्रव्यवहार आणि बैठका घेतल्या आहेत. यावेळीही, अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाची जलदगती चाचणी करण्यासाठी पुणे विभागाचे रेल्वे वाहतूक सुरक्षा आयुक्त मनोज अरेरा यांच्यासह रेल्वे प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी आले असता आ.संदीप क्षीरसागर यांनी अधिकाऱ्यांची भेट घेऊन रेल्वे पुलांचा विषय त्यांच्यासमोर मांडला. तसेच रेल्वे विभागाने याबाबतचा सविस्तर प्रस्ताव याप्रकरणी तोडगा काढण्यासाठी कार्यवाही करण्याची मागणी केली. याप्रसंगी खा.बजरंग सोनवणे, माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष गणेश वरेकर आदी उपस्थित होते.

## गेवराई सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर



**तलवाडा । प्रतिनिधी**

दिनांक ६ फेब्रु. गुरुवार गेवराई शहरात सार्वजनिक साजरा होणाऱ्या आदर्श शिवजयंतीच्या नियोजनाची बैठक रोजी सिंधी भवन येथे संपन्न झाली.गेवराई सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवडड.संजय भाऊ काळे व शहरातील प्रतिष्ठित नागरिकांच्या उपस्थितीत पार पडली .अध्यक्षपदी सर्वप्रथम श्री. राहुल जिजा खंडागळे, सुभाषराव मुळे, ॲड राहुलकुमार राका (नोटरी), विकास पवार, सागर परदेशी, तर उपाध्यक्षपदी आनंद दाभाडे, डॉ. मिलिंद गावडे, गणेश निकम, महेश निळकंठ, संदीप साळवे, गणेश गाडेकर, सुघोष मुंडे, कमलेश वाघमारे, शेख मन्सूर भाई, शुभम कानडे. कार्याध्यक्षपदी शामराव गायकवाड पाटील तर सचिव पदी समाधान जिजा मस्के, सहसचिव श्रीनिवास बेदरे, कोषाध्यक्ष पदी मुकेश अण्णा महाजन, सह कोषाध्यक्ष दिग्विजय (गोटू शेठ) पोतदार मिरवणूक समिती बाळासाहेब मोटे, शिरीष भोसले बाबासाहेब घोडके, तुळशीराम मोहरकर, विलास खिसाडे, बबलू खराडे, साहिल देशमुख, माधव अण्णा बेदरे, बाबुराव गवारे, जयसिंग माने, बंटी यादव, शेख मंजूर भाई बारुदवाले, अक्षय पवार, विलासराव मस्के गोविंद दाभाडे अमोल गावडे, उमेश निकम, अशोक जवंजाळ, जयेश दाभाडे, शाम निकम, लंकेश मोटे, गणेश घुंबाडै, मगन दायमा, श्रीपाद रामदासी, दिनेश मोटे, शंकर परळकर, मनोज हजारे, हरिभाऊ वाघ, लखन चोरमले, उमेश पवार, निखिल जंगले, महादेव कानगुडे, अभिजीत छाजेड, रमेश पवार, अक्षय हातगुले, सुनिल पालवे, महेश नागरे, आनंद जाधव, बाबासाहेब गायकवाड, रणजीत डरपे, अंकुश धापसे, श्रीराम चोरमले, दीपक खंडागळे, बाली मापारे हरिभाऊ वाघ. कैलास वाघरे, शरद धापसे, संभाजी निकम कार्यकारी समिती आमदार विजयसिंह राजे पंडित मा. आ. बदामराव पंडित, लक्ष्मण अण्णा पवार, ॲड.. संजय भाऊ काळे, ऋषिकेश बेदरे, ॲड.अमित मुळे, प्रताप शेठ खरात, सतिष दादा दाभाडे, श्याम काका येवले, रोहीत पंडित,धम्मपाल कांडेकर, बाळासाहेब सानप, शफीभाई आतार, गणेशराव नलवडे,जयराज सेठ कौराणी, श्याम भाऊ भुतडा, उत्तम राव सोलाणे, मनोहर भाऊ पिसाळ, सुशील भाऊ जवंजाळ, कैलासराव माने, केशव पंडीत, राजेंद्र डाके पाटील, भाऊसाहेब गोंजारे, विलास निकम, सचिन पंडित, बाळासाहेब लाटे पाटील, प्रशांत जाकिटे,जान मोहम्मद बागवान, ॲड बाबासाहेब घोक्षे, राजेंद्र दादा बेदरे, प्रमोद मोटे, राजेंद्र मोटे.

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्या प्रकरणी आरोपीस जामीन मंजुर : ॲड.शेळके

**बीड । प्रतिनिधी**



सविस्तर बातमी अशी की, दिनांक २२/०१/२०२५ रोजी रात्री ०७.०० वाजण्याच्या सुमारास पिडीत ही आरोपी नामे आप्पाराव महादेव कंगले यांचे घरी टि.व्ही. पाहण्यासाठी गेली होती. टि.व्ही. पाहत असतांना पिडीतेला झोप लागली. त्यानंतर दिनांक २३.०१.२०२५ रोजी पहाटे ०५.३० वाजण्याच्या सुमारास आरोपीने पिडीतेचा विनयभंग केला अशी फिर्याद पिडीतेच्या नातेवाईकांनी पिंपळनेर पोलीस स्टेशन येथे गुन्हा र.क्र. २१/२०२५ नुसार दिली. त्यावरुन आरोपीचे विरुध्द कलम ७४,७५ भारतीय न्याय संहितेचे सह कलम ८.१२ पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलीसांनी आरोपीस ताब्यात घेतले व अटक करुन मा. जिल्हा व सत्र न्यायालय, बीड येथे हजर केले असता मा. न्यायालयाने आरोपीस न्यायालयीन कोटवडी सुनावली . सदर आरोपीने जामीन मिळणेसाठी ॲड. युवराज शेळके यांचे मार्फत मा. जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. आरोपी यांचे वकिल यांनी केलेला बचाव व युक्तीवाद ग्राहय धरुन मा. जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीचा जामीन अर्ज मंजुर केला. आरोपीच्या वतीने ॲड.. युवराज शेळके यांनी काम पाहिले व त्यांना ॲड. श्रीराज शेळके यांनी सहकार्य केले.

## माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा येथील दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**तलवाडा । प्रतिनिधी**

तलवाडा येथील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा येथील फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये होऊ घातलेल्या परीक्षा साठी, दहावी व बारावीला शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना आज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा येथे निरोप देण्यात आला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून जयभवानी व जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, सहप्रशासकीय अधिकारी गोगुले सर, लेखापाल हाटोटे सर, पोलीस स्टेशन तलवाडा चे चव्हाण साहेब आधी उपस्थित होते. दहावी बारावीच्या विद्यार्थिनीने आपले मनोगत व्यक्त केले. त्याचबरोबर शाळेच्या वतीने पाठक सर, लाड सर,जूनियर च्या वतीने प्रा.सी.बी. तौर सह प्रा. गोगुले सर, हाटोटे सर, चव्हाण साहेब तसेच गोरकर सर यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना भवितव्याच्या करिअर विषयी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप हाटकर सर यांनी केला. यावेळी सर्व शिक्षक वृंदासह इयत्ता नववी ते बारावीचे विद्यार्थी उपस्थित होते.तर प्रस्ताविक जाधव सर यांनी करून प्रा.भोसले सर यांनी आभार मानले.

### ॲट्रॉसिटी व अपहरण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपातुन आरोपीची अटकपूर्व जामीन मंजुर: ॲड.सचिन काळे

**बीड । प्रतिनिधी**



ॲट्रॉसिटी व अपहरण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपातुन अमोल उर्फ भोला दुनघव याची अटकपूर्व जामीन मंजुर घटने बद्दल थोडक्यात माहिती अशी कि दिनांक.०८/०६/२०२४ रोजी संध्याकाळी मी घरी झोपलेलो असताना माझ्या घरचा दरवाजा वाजवला असता मी कडी उघडून पाहिले असता मोहन गायकवाड, इस्माईल शेख व अमोल उर्फ भोला दुनघव दारात दिसले मी विचारले काय काम आहे असे म्हणालो त्यांनी मला घराबाहेर बोलून तुझ्याकडे काम आहे तुला सांगतो असे म्हणून मला त्याची खाजगी गाडी वेरणा मध्ये बसून मला म्हणाले की तू दुसऱ्याच्या गाडीवर जाऊ नकोस माझे गाडीवर ड्रायव्हर म्हणून ये असे म्हणून मला बीडचे परळी रोडवरील रोहन बार येथे घेऊन गेले मी म्हणालो मला तुमच्या गाडीवर यायचे नाही असे म्हणताच मोहन गायकवाड राहणार शिंदे नगर याने लोखंडी रॉड ने माझे डोक्यात मारून मला गंभीर दुखापत केले. मी खाली पडल्यावर पुन्हा राज गायकवाड याने दगड घेऊन माझे डावे खांद्यावर मारून फॅक्चर केले इस्माईल शेख यांनी माझ्या हाताला धरून अमोल उर्फ भोला दुनघव ड्रायव्हर यांनी पण मला घरातून घेऊन जाऊन डोक्यात रॉड ने मारून गंभीर मारहाण केली आहे मी बेशुद्ध असल्याने मला सरकारी दवाखान्यात कोणी आणले हे माहीत नाही सरकारी दवाखाना बीड येथे औषध उपचार चालू असून डॉक्टरने माझ्या डोक्याचा फोटो काढून सिटी स्कॅन करून ओप्रेशन करावे लागणार असे सांगितले तरी वरील लोक मोहन गायकवाड, इस्माईल शेख, अमोल उर्फ भोला ड्रायव्हर यांनी अपहरण करून माझ्या डोक्यात रॉड ने मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ करून जीव मारण्याच्या धमक्या दिल्या आहेत अशी फिर्याद ०९/०६/२०२४ शहर पोलीस स्टेशन येथे दिली होती तरी त्यास गु.र.नं १२५/२४ कलम ३०७,३६४,५०६,५०४,३४ भा.द.वी व ॲट्रॉसिटी ॲक्ट नुसार गुन्हा नोंद झाला होता सदर आरोपीने न्याय मिळवण्यासाठी ॲड. सचिन काळे यांच्या वतीने माननीय जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला आरोपी यांचे वकिल यांनी केलेला बचाव व युक्तिवाद इत्यादी बाबी ग्राह्य ग्राह्य धरून मा.जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला आरोपीच्या वतीने ॲड.सचिन काळे यांनी काम पाहिले त्यांना ॲड. पवन नागरगोजे यांनी सहकार्य केले .


## जाहीर प्रगटन

ॲड. डी. एम. रोटे

**मा. श्रीमती टी. ए. आसरकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज १५३/२०२५, अनीता वगैरे विरुध्द निरंक**

अर्जदार :-(१) अनीता सुरेश कदम, वय ३९ वर्ष, धंदा घरकाम २) खंडु सुरेश कदम, वय २८ वर्ष, धंदा शेती, (३) आकाश सुरेश कदम, वय २५ वर्ष, धंदा शेती, वरील सर्व रा. -- जैताळवाडी, ता. जि. बीड, (४) प्रियंका बाबासाहेब शिंदे, वय २२ वर्ष, धंदा घरकाम रा. भवानवाडी, ता. जि. बीड

विरुद्ध

**मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सुरेश हरिभाठ कदम यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत सुरेश हरिभाउ कदम यांचा मृत्यु दि. ३०/०६/२०२४ रोजी** जैताळवाडी, ता. जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झाले आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु **मयत सुरेश हरिभाऊ कदम** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३ माहे जानेवारी २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०६ मार्च २०२५.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा.श्रीमती एफ.बी. बेग २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १८३५/२०२४**

**सखुबाई वि. निरंक, विधीज्ञ -श्री. डि.एम. रोटे**

**मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदारः १) सखुबाई भ्र. श्रीराम आवारे, वय- ५० वर्षे, धंदा- घरकाम, पत्ता - मानेवाडी ता.जि.बीड, २) राहुल पि. श्रीराम आवारे, वय- ३६ वर्षे, धंदा- शेती, राहणार- मानेवाडी ता.जि.बीड, ३) पुजा भ्र. उमेश आहेर, वय- ३३ वर्षे, धंदा- घरकाम, राहणार- डोकेवाडी ता.भुम जि.धाराशिव, वय- ७५ वर्षे, धंदा- घरकाम, ४) कमलबाई भ्र. सोपान आवारे, राहणार- मानेवाडी ता.जि.बीड

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे ज्याअर्थी मयत नामे **श्रीराम सोपान आवारे, राहणार मानेवाडी, ता. जि. बीड हे दिनांक १७/१०/२०२१ रोजी सहयाद्री हॉस्पीटल, शास्त्रीनगर, पुणे ता.जि पुणे येथे मयत झालेले आहेत.** अर्जदार क्र. १ ही मयत नामे **श्रीराम सोपान आवारे** यांची पत्नी असुन अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आहे. तर अर्जदार क. ३ ही मयताची विवाहीत मुलगी असुन अर्जदार क. ४ ही मयताची आई आहे. मयत नामे श्रीराम सोपान आवारे, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत **श्रीराम सोपान आवारे**, याच वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०३/०२/२०२५ आहे. आज दिनांक ०६/०१/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

अँड डि एम रोटे

**मा.श्री ओ.एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १८३६/२०२५, श्रीमती रंगुबाई भ्र. दामू वाळके व ईतर विरूध्द निरंक**

अर्जदार -१. श्रीमती. रंगुबाई भ्र. दामू वाळके, वय ८० वर्षे, धंदा - घरकाम, २. त्रिबंक पि. दामू वाळके, वय ६२ वर्षे, धंदा - शेती, वरील दोघे रा. खंडाळा पो. मोरगांव ता. जि. बीड, ३. उत्तम पि. दामु उर्फ दामोधर वाळके, वय ६१ वर्षे, धंदा शेती, रा. पावरहाउस जवळ, कामतघर, भिवडी, ठाणे, ४. गहिनीनाथ पि. दामु उर्फ दामोधर लोखंडे उर्फ वाळके, वय ५८, व्य. शेती रा. घर नंबर २०३० साई कृष्णलीला, अहमदनगर ता. जि. अहमदनगर ५. पमाबाई भ्र. माणिक आहेरकर, वय ४९ वर्षे, धंदा शेती, रा. मुळूकवाडी पो. लिंबागणेश ता. जि. बीड

विरुध्द निरंक

**मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत दामू हुलाजी वाळके, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी **मयत दामू हुलाजी वाळके,** यांचा मृत्यु दिनांक ०६/१०/२०२४ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत **दामू हुलाजी वाळके,** यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत **दामू हुलाजी वाळके,** यांचे वारसअसल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३१/०१/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि.१७/०२/ २०२५ आहे.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

अँड. डि.एम रोट

**मा.श्री आर. जी. बागडे साहेब, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १६४/२०२५ मंगल विरूध्द निरंक**

अर्जदार - १. मंगल भ्र. शेषेराव ढास, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम, रा. सुलतानपुर, ता. जि. बीड. २. नितीन पि. शेषेराव ढास, वय - ३५ वर्षे, धंदा- शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. संदिप पि. शेषेराव ढास, वय ३१ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ४. देवराव पि. तुळशीदास ढास वय ८४ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ५. मनीषा भ्र. हरि शेंडकर, वय ३३ वर्षे, धंदा घरकाम,रा. पाचंग्री ता. पाटोदा जि. बीड.

**मागणी - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत शेषेराव पि. देवराव ढास मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत **शेषेराव पि. देवराव ढास यांचा मृत्यु दिनांक २५/१२/२०२२ रोजी** झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत शेषेराव पि. देवराव ढास यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत **शेषेराव पि. देवराव ढास** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २८/०१/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १५/०३/२०२५ आहे.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## थोडक्यात

### पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा

**बीड । प्रतिनिधी**

पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. दि. ७ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १४.०० वाजता सुभेदारी शासकीय विश्रामगृह, छत्रपती संभाजीनगर येथून वाहनाने बीडकडे प्रयाण. दुपारी ४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे आगमन व बीड जिल्हयातील अवैध वाळू व तत्सम गौण खनिज उत्खननामुळे होणारा पर्यावरणाचा –हास, बीड जिल्हयातील अवैध डोंगर पोखरल्यामुळे होणारी पर्यावरणाची हानी तसेच औष्णिक वीज प्रकल्प, परळी येथे होणा–या राखेच्या वाहतुकीमुळे होणारे प्रदुषण याबाबतच्या बैठकीस उपस्थिती. सायंकाळी १७.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथून शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण. सायंकाळी १९.०० वाजता बीड येथून वाहनाने छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण.

### मत्स्य व्यवसायासठी पात्र संस्थानी बोली प्रक्रियेत भाग घ्यावा

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील ५०० एकर खालील जलक्षेत्र असलेल्या तांदुळवाडी त. तालुका धारूर (सरासरी जल क्षेत्र २७.२५ हेक्टर) हा पाटबंधारे तलाव मासेमारी संदर्भात ठेक्याने देण्यासंदर्भात शासनाने सन २०१९ मध्ये निर्णय घेतला या निर्णयातील तालुक्यातील मच्छी व्यवसाय सहकारी संस्थे अंतर्गत (बोली) जाहीर लिलाव पद्धतीने ठेक्याने देण्यासाठी दिनांक १९ डिसेंबर २०२४ रोजी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय बीड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय तलाव ठेका समितीची सभा झाली त्या सभेमध्ये जिल्ह्यातील तांदुळवाडी ता. धारुर पाटबंधारे तलाव जाहीर लिलावा पध्दतीने ठेक्याने देण्याबाबत कार्यवाही प्रस्तावित आहे. लिलावातील तलावाचे नांव न्युनतम तलावठेका रक्कम, तलावठेका सुरक्षा अनामात रक्कम व वार्षिक इष्टत्तम मत्स्यबोटुकली संचयन किमतीच्या १० टक्के रक्कम तसेच अटी व शर्ती सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय बीड यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्यास उपलब्ध आहेत. तरी पात्र संस्थानी बोली प्रक्रियेत भाग घ्यावा असे असे आवाहन मत्स्य व्यवसायचे सहाय्यक आयुक्त यांनी केले आहे. भुजलाशयीन मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था नोंदणीसाठी सुधारित निकषानुसार ५०० हेक्टरच्या आतील एखाद्या तलावावर नोंदणी असलेले संस्था काही कारणास्तव काळया यादीत किंवा बंद असल्यास जवळच्या पाच किलोमीटर अंतराच्या आतील संस्थेचे त्या तलावावर त्या कालावधी करिता निर्धारण करण्यात येईल.

### NSS स्वयंसेवक पदाकरिता ऑनलाइन अर्ज सादर करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

भारत सरकार तरुणांना डिजिटल कृषी मिशनचे अंमलबजावणीमध्ये सहभागी करून घेऊ इच्छित आहे. तसेच युवांना स्वंयसेवी गटामध्ये संघटीत करुन त्यांची ऊर्जा आणि क्षमता राष्ट्र उभारणीच्या कार्यासाठी, वापरण्यासाठी उत्सुक आहे. स्वयंसेवकांना आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, लिंगभेद आणि इत्तर सामाजिक समस्यावर आधारित मोहिमा जागरूकता कार्यक्रमांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावण्यास सांगितले जाऊ शकते आणि आपत्कालीन परिस्थितीत किंवा विविध कार्यक्रमाचे अंमलबजावणीसाठी आवश्यकतेनुसार प्रशासनाला मदत करण्याकरिता इच्छुक उमेदवाराकडून, विद्यार्थ्याकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. अर्ज कसा करावा:– योजनेबद्दलची सविस्तर माहिती तथा अर्जाच्या नमुन्यासाठी नेहरू युवा केंद्र संगठनच्या www.nyks.nic.in या संकेतस्थळाला ऑनलाईन अर्ज सादर करून त्याची प्रत आवश्यक कागदपत्रासह नेहरू युवा केंद्र परभणी येथे दि. ८ फेब्रुवारी २०२५ पूर्वी सादर करावा,नेहरु युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी बीड,जिल्हा कार्यालय, दिप एजन्सी, नगर रोड, बीड– ४३११२२ मोबाईल क्र. ९८५०९३९८०२ email.qnykbeedgmail.com यावर संपर्क साधावा.

### ओबीसी लाभार्थ्यांना थकित व्याज रक्कम एकरक्कमी भरण्यास ३१ मार्च पर्यंत ५० टक्के सवलत

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित, मुंबई जिल्हा कार्यालय बीड यांच्यामार्फत बीड जिल्हयातील इतर मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांना व्यवसायासाठी अल्प व्याज दराने कर्ज वितरीत करण्यात आलेली आहे त्यापैकी ब–याच लाभार्थ्यांची कर्ज परतफेडीची मुदत संपलेली असून थकित कर्ज वसुली होण्याच्या दृष्टीने ओबीसी महामंडळाच्या थकित कर्ज प्रकरणात संपूर्ण कर्ज रक्कमेचा एकरक्कमी भरणा करणा–या लाभार्थ्यांनां थकित व्याज रक्कमेत ५० टक्के सवलत देण्यासाठी एकरक्कमी परतावा (OTS) योजना दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत राबविण्यात येत आहे. त्यानुसार ओबीसी महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थ्यांना या योजनेचा फायदा घेऊन कर्ज मुक्त व्हावे व होणारी कार्यवाही टाळावी असे आवाहन ओबीसी महामंडळाचे व्यवस्थापक यांनी केले आहे.

### मधुकर खाडे यांचे निधन

**केज । प्रतिनिधी**



तालुक्यातील होळ येथील पैलवान मधुकर दत्तुबा खाडे यांचे गुरुवारी (दि.६) उपचारादरम्यान पुणे येथे रुग्णालयात निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ६४ वर्षे होते. होळ येथील शिवछत्रपती क्रीडा व व्यायामशाळा, संत भगवानबाबा वारकरी शिक्षण संस्थेचे ते सचिव होते. व्यायामशाळा परिसरातील विद्युत पोललगत असलेल्या झाडांच्या फांद्या ते स्वतः झाडावर चढून कापत होते. यावेळी विद्युत तारेला स्पर्श होऊन करंट लागल्याने ते खाली कोसळले. यावेळी त्यांच्या पाठ व पोटाला गंभीर ईजा झाली होती. उपचारादरम्यान पुणे येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पोलीस दलात कार्यरत गोविंद, व्यंकटी, व्यवसायिक बालाजी ही तीन मुले आहेत. तसेच, दोन भाऊ, वडील, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर होळ येथे शिवछत्रपती क्रीडा व व्यायाम शाळेसमोर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी वारकरी सांप्रदाय, कुस्ती, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील नागरिकांची उपस्थिती होती.

# शेतकऱ्याचा अंत पाहू नका,
# तत्काळविद्युत पुरवठा सुरळीत करा: राजेंद्र आमटे

**बीड । प्रतिनिधी**

खांडे पारगाव परिसरातील शेतकऱ्यांना विद्युत पुरवठा सुरळीत होत नसल्याने वैतागलेल्या शेतकरी, नागरिक महिला, विद्यार्थी यांच्या वतीने महा वितरण विरोधात शेतकरी आक्रोश मोर्चा, व जाहीर निदर्शने आंदोलन शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांच्या पुढाकाराने अधीक्षक अभियंता विभागीय महावितरण कार्यालय जालना रोड बीड येथे करण्यात आले.

महावितरण अधीक्षक अभियंता विभागीय कार्यालय जालना रोड बीड येथे प्रभारी अधीक्षक अभियंता कांबळे साहेब कार्यकारी अभियंता सानप साहेब यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांनी महावितरण कार्यालय मध्ये जाहीर निदर्शने केली तीन तास शेतकरी, महिला, नागरिक यांनी ठिय्या आंदोलन केलं शेतकरी महावितरण विरोधात आक्रमक भूमिका घेतली. लेखी आश्वासन दिल्याशिवाय न उठण्याचा निर्णय शेतकरी घेतला शेतकऱ्यांच्या भूमिके पुढे प्रशासन झुकले तत्काळ लेखी आश्वासन देत आंदोलन मघे घेण्याचे विनंती

### महावितरणच विद्युत पुरवठा सुरळीत करण्याचं लेखी पत्र



केल्यावर शेतकऱ्यांनी आंदोलन तात्पुरते स्थगित केले. आमदार संदीप क्षीरसागर यांनी शेतकरी आक्रोश मोर्चा भेट देऊन पाठींबा

**आमदार संदीप क्षीरसागर यांनी शेतकरी आक्रोश मोर्चा भेट देऊन पाठींबा दिला. डॉ ज्योतीताई मेटे यांनीही अधीक्षक अभियंता यांना दूरध्वनी सूचना केल्या व पाठींबा दिला**

दिला व अधिकारी यांना सूचना केल्या व डॉ ज्योतीताई मेटे यांनी अधीक्षक अभियंता यांना दूरध्वनी संपर्क करून प्रश्न सोडवण्याच्या सूचना केली जिल्हाध्यक्ष सुभाष जाधव शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष, राजेंद्र मस्के राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, यांनी शेतकरी आंदोलनास भेट देऊन पाठींबा दिला. अधीक्षक अभियंता महावितरण यांनी सात गावातील विद्युत पुरवठा सुरळीत केला जाईल, सात गावात नवीन विद्युत तारा बदलण्याचे काम सुरू करू ,उच्च दाबाने विद्युत पुरवठा केला जाईल, ५ चत ट्रान्सफॉर्मर निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर बसवण्याची अंमलबजावणी करू, नवीन विद्युत उपकेंद्र प्रस्ताव मागून घेण्यात येईल, शेख यांची नियुक्ती निर्णय घेण्यात येईल वरील मागण्याचे लेखी आश्वासन देत आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

## पाटोदा तालुक्यातील मेंगडेवाडी गावात बिबट्याच्या हल्ल्यात वयोवृद्ध महिलेचा मृत्यू

### वनविभाग व पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल : डॉ.गणेश ढवळे

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील मेंगडेवाडी गावातील उखारा शिवारात आज दि.६ गुरूवार रोजी दुपारी बिबट्याच्या हल्ल्यात श्रीमती सोजरबाई धोंडीराम बोबडे वय ६५ वर्षे या वयोवृद्ध महिलेचा मृत्यू झाला असुन या परीसरात बिबट्याची दहशत पसरली आहे. वनविभाग आणि पोलिस प्रशासनाला याची फोनवरून भगवान शिंदे यांना कळविण्यात आले आहे. भगवान शिंदे यांच्या म्हणण्यानुसार श्रीमती सोजरबाई



धोंडीराम बोबडे या दुपारी १२ वाजता शेतातील जनावराच्या गोठ्यात नेहमीप्रमाणे जात असतात. आज दुपारी ३ वाजता बिभिषण दासु शिंदे यांनी शेतातील जनावरे आणण्यासाठी जात असताना त्यांच्या गोठ्याशेजारी शेतात सोजरबाई यांचे प्रेत पाहीले. त्यांच्या अंगावरील जखमावरून बिबट्याने नरडीचा घोट घेतल्याचे दिसून आले. शेतात बिबट्याचे ठसे दिसुन आले.त्यांनी सोजरबाई यांच्या नातु जगन्नाथ बबन बोबडे यांना फोनवरून कल्पना दिली. त्यानंतर घटनास्थळी ग्रामस्थांनी धाव घेतली. भगवान शिंदे यांनी पाटोदा वनविभागाचे अधिकारी आरएफओ श्रीकांत काळे ( मो.नं.९०७५४९५७६१ ) व पोलीस प्रशासन पोलिस निरीक्षक जाधव ( मो.नं. ७७२२०३५२०९ )यांना फोन वरून कल्पना दिली.

### शासनानेच शासनाला फसवले ?

## मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पाला दिलेली 10 हेक्टर जागा सापडेना

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणीत मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पाला गायरान जमीन शासनानेच शासनाकडे २०२१ मध्ये हस्तांतरीत केली होती. मा.जिल्हाधिकारी बीड यांनी जागा दिल्याचा आदेशही काढला त्यानंतर मोजनी झाली व मोजनीचा नकाशा झाला.जागेचे मार्कवूट झाले सातबारा अट अ आणि फेरफार झाले व हे सर्व महावितरणच्या नावे झाले.महाविरण लातुर यांना वडवणी तत्कालीन तलाठी, मंडळ अधिकारी यांनी चलन भरुन ताबा पावती दिली.त्यानंर महावितरण यांनी सर्व विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळवले त्यानंतर टेंडरही झाले व नंतर हस्तांतरीत जागेत काम चालू झाले.त्यानंतर तहसीलदार वडवणी यांनी सौर ऊर्जा प्रकल्पालाकडे वाहन ये जा साठी रस्ता दिला.दोन किलोमीटर रस्त्याचे कामही पूर्ण झाले.परंतु या ठिकाणी शासनाची जागा नसल्याचे भुमीअभिलेख कार्यालयाकडून सांगण्यात आले.म्हणून तहसीलदार यांनी काम थांबवले.त्यानंतर सर्व शासकीय व खासगी जागेची नव्याने मोजनी केली.गट नं २५९ खाजगी व गट नं२६० गायरान जमीन मोजनी केली आसता या ठिकानी १११.६८ हेक्टर जागा शासनाची गायब झाल्याचे भुमीअभिलेख यांच्या लक्षात आले.

## गृहरक्षक दलाचे प्रशिक्षण शिबिर संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

माजलगाव येथील गृहरक्षक दलाचे शस्त्र प्रशिक्षण शिबीर मागिल आठ दिवसांपासून सुंदरराव सोळंके महाविद्यालय येथे सुरू होते काल शिबीराची सागता झाली. असून या शिबिरात एकूण ७१ जवानांनी सहभाग घेतला होता त्यांना खात्या अंतर्गत शस्त्रा बाबतीत व ईतर प्रशिक्षण अपर पोलीस अधीक्षक तथा जिल्हा समादेशक सचिन पाडकर यांच्या आदेशाने व केंद्र प्रमुख सूरेश जव्हेरी प्रशासकीय अधिकारी प्रकाश बताडे यांचे मार्गदर्शन खाली कर्तव्य अधिकारी सि.ए.घोलप ता.स.पांचाळ मानसेवी निर्देशक दिपक वाघमारे बाबासाहेब कुलथे घनश्याम पवार यांनी आठ दिवस मेहनत घेऊन वरिल जवानांना प्रशिक्षण दिले असून दि.०६/०२/२०२५ गुरूवार रोजी निरोप समारंभ झाला असून सुंदरराव सोळंके महाविद्यालचे





प्राचार्य. श्री. जि.के सानप यांचा सत्कार घोलप यांनी केला. उप प्राचार्य कवाळे यांचा सत्कार पांचाळ यांनी केला तर घोलप यांचा सत्कार बाबासाहेब कुलथे यांनी केला दिपक वाघमारे यांचा सत्कार सूखदेव शिंदे यांनी केला तसेच पत्रकार अरविंद ओव्हळ, पत्रकार विष्णू उगले, पत्रकार कमलेश जाबरस, पत्रकार रत्नाकर कुलथे, पत्रकार बालासाहेब फपाळ, पत्रकार सूधिर नागापूरे यांचा सत्कार बी. जी. कुलथे यांनी केला. यावेळी मान्यवरांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला शस्त्र प्रशिक्षणा ची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमा वेळी स्वप्निल टाक सर, दहिवाळ सर जिल्हा न्यायालय चे प्रसिद्ध अँड. गिरीश कुलथे स्वामी सर श्री. सि.ए.घोलप, एम. एम. पांचाळ श्री.बी.जी. कुलथे, अविनाश उंबरे, वाघमारे पवार यावेळी आभार कुलथे यांनी मानले. व सर्व अधिकारी व गृहरक्षक दलाचे जवान मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## ऊसतोड कामगाराच्या अनाथ झालेल्या कुटुंबाला वडवणीकरांची आर्थिक मदत

### शहरात ७५ हजार रु.चा निधी जमा

**वडवणी । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील वारोळा तांड्यातील बंजारा समाजातील ऊसतोडणी मजूर कारखान्यावरुण परत येत असताना ट्रॅक्टर पलटी होऊन अनिल आणि त्यांची पत्नी आरती हे जागीच ठार झाले होते. त्यांच्या पश्चात तीन चिमुकले मुलं असुन या अनाथ झालेल्या लेकरांच्या मदतीसाठी काल दिनांक ५ फब्रुवारी रोजी वडवणी शहरात मदत फेरी काढण्यात आली. या मदत फेरीला वडवणी तालुक्यातील बांधवांनी चांगले सहकार्य केले असून पंच्याहत्तर हजार रुपये एवढा निधी जमा झाला आहे. या संदर्भात अधिक माहिती अशी की, आठ दिवसांपूर्वी माजलगाव





तालुक्यातील वारोळा तांड्यातील बंजारा समाजातील अनिल आणि आरती हे पती पत्नी ऊसतोडणीचे काम संपल्यानंतर आपल्या गावी परत येत असताना ट्रॅक्टर पलटी झाल्याने या अपघातात ते जागीच मृत्यू मुखी पडले होते. मयत राठोड यांच्या पश्चात दोन मुलं आणि एक मुलगी असुन हे चिमुकले मुलं अनाथ झाले. आहेत, या चिमुकल्या लेकरांना मदतीचा हात पुढे करण्याचे आवाहन केल्यानंतर बीड जिल्ह्यातुन आणि राज्याच्या विविध भागातून अनेक लोकांनी मदतीचा हात पुढे केला होता, याचाच एक भाग म्हणून वडवणी शहरात मदत फेरी काढण्यात आली. या मदत फेरीला सर्व बांधवांनी चांगली सहकार्य केले.

## तब्बल २४ वर्ष देशाच्या संरक्षणासाठी जिवाची बाजी लावली

### धनंजय राऊतांचा सेवानिवृत्ती निमित्त भव्य गौरव

**बीड । प्रतिनिधी**

चिंचोली माळी गावचे फौजी धनंजय साहेबराव राऊत हे गेली २४ वर्षापासुन भारतीय सैन्य दलात कार्यरत आहेत. अवघ्या सोळाव्या वर्षी सैन्य दलात दाखल झालेल्या धनंजय राऊत यांनी देश संरक्षणार्थ जीवाची बाजी लावत देशाचे संरक्षण केले. नुकतेच ३१ जानेवारी रोजी ते आपल्या सैन्य दलातुन सेवानिवृत्त झाले आहेत. यानिम्मित २ फेब्रुवारीला संपुर्ण राऊत परिवार व शिवाजी धांडे नगर येथिल मित्र परिवार यांनी त्यांची भव्य मिरवणुक काढत त्यांचा नागरी सत्कार करून सेवा गौरव केला. केज तालुक्यातील चिंचोली गावामधील १५० पेक्षा जास्त तरुण हे भारतीय सैन्य दलात कार्यरत आहेत. याच कारणामुळे देशाविषयी प्रेम व आदराची भावना धनंजय यांच्या मनात वाढत गेली व त्यांनी देशसेवेसाठी सैन्य दलात भरती होण्याचा निर्धार केला. घरची परिस्थिती अत्यंत हालाकीची, वडिल दुसऱ्याच्या शेतामध्ये मोल मजुरी करुण कुटुंबाचा उदर–निर्वाह करायचे. पण धनंजय राउत यांना देशसेवेसाठी सैन्य दलात पाठवण्याचा निर्धार त्यांच्या देशभक्त वडिलांनी केला होता.

धनंजय हे दहावी नंतर पुढील





शिक्षणासाठी संभाजीनगरला काकाकडे राहिले. शिक्षणाची फिस भरण्यासाठी एका फोन बुथ वर काम करून शिक्षण सुरु ठेवत भरतीसाठी सराव केला. कठीण परिश्रमातून सैन्य दलात सामील झालेल्या धनंजय राऊत यांना ११ जानेवारी २००१ रोजी भारतीय सैन्य दलाच्या प्रशिक्षणासाठी बेळगाव येथे बोलवण्यात आलें. सुरवातीच्या काळात मराठा लाईट इन्फंट्री मध्ये निवड झाल्यानतंर बेळगावमध्ये त्यांनी भारतीय सैन्यदलाच प्रशिक्षण पुर्ण केल. अतिशय साहसी व जिगरबाज सैनिक म्हणून त्यांची ओळख मराठा बटालियनमध्ये तसेच भारतीय सैन्य दलामध्ये आहे.

## ज्ञानदीप विद्यालयाची शैक्षणिक सहल संपन्न

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर येथील ज्ञानदीप प्राथमीक विद्यालयाची शैक्षणीक सहल ऐतीहासीक व धार्मीक व नैसर्गीक स्थळी काढण्यात आली व बालविद्यार्थ्यांना माहीती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी या शैक्षणीक सहलीचा मनमुराद आनंद लुटला. किल्ले धारूर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रामध्ये आघाडीवर असणाऱ्या ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल नुकतीच संपन्न झाली. या सहलीमध्ये विद्यार्थ्यांना ऐतिहासिक वारसा असलेली स्थळे, पर्यटन स्थळे, किल्ले, त्याचबरोबर विद्यार्थ्यांना आनंद मिळावा यासाठी वाटर पार्क, बोटिंग, डव्हेंचर व विविध खेळणी दाखवण्यात आली त्याचा खूप असा आनंद विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक सहलीमध्ये घेतला अशा अनेक विविध ठिकाणी या सहलीचे आयोजन विद्यालयाच्या वतीने करण्यात आलेले होते. या सहलीसाठी सहल प्रमुख म्हणून शिक्षक विठ्ठल सुरवसे , अशोक अंडील , राम दराडे यांनी काम पाहीले मुख्याध्यापक शेख. एस. एन. व शैला महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व शिक्षकवृंद यांच्या सहकार्यातून उत्कृष्ठ असे नियोजन केले होते. शेवटी आनंददायी व उत्साहवर्धक वातवरणामध्ये सहल संपन्न झाली.

